**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २९९ प्रमाणे आरोपीच्या गैरहजेरीत साक्षीदाराचा पुरावा</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:
माझे नावः सुहास केशव गांधी
वयः ६९ वर्षे, व्यवसायः किराणा दुकान,
राहणार – वरसगाव नाका, रोहा, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. एस. कुलकर्णी यांच्यामार्फत :</u>**

०१. माझे किराणा दुकान वडीलोपार्जित असुन मी माझ्या वयाच्या १६ वर्षांपासुन दुकान बघत आहे. फिर्यादी निलेश माझा चुलत भाऊ असुन त्याचे देखील आंबेवाडी येथे किराणा मालाचे दुकान आहे. सन २००९ मध्ये निलेशच्या दुकानासमोर त्याने त्याची पिकअप गाडी उभी केली होती. ती गाडी रात्री ०१.३० च्या सुमारास चोरीला गेल्याचे सकाळी उठल्यानंतर निदर्शनास आले. निलेशने त्याबाबत फिर्याद दिली होती.

०२. त्यानंतर महिना – दिड महिन्याने पोलीसांना चोरीला गेलेल्या गाडीबाबत समजले. पोलीसांनी मला कोलाड पोलीस ठाण्यात बोलावले होते. माझ्यासोबत दुसरा पंच अनंत तळकर होता. फिर्यादी निलेश देखील तेथे होता. पोलीसांनी आम्हाला परभणी येथील पठाण नावाच्या व्यक्तीने आमची गाडी चोरुन नेवुन त्याच्या धंदयासाठी परभणी – लातुर रस्त्यावर लावल्याचे सांगितले. सदर गाडी चोरुन नेल्यानंतर त्या गाडीचा वाटुर – परभणी रस्त्यावर अपघात झाला होता, ती गाडी झाडावर आदळली होती. त्या गाडीचे मागचे व पुढचे तीन टायर चोरुन नेणा–याने काढुन विकले होते. त्याप्रमाणे मी, तळकर, निलेश व दोन – तीन पोलीस असे सर्वजण रात्री वाटुर– परभणी रस्त्यावर ज्या ठिकाणी गाडी होती तेथे

जाण्यासाठी निघालो व दुस–या दिवशी सकाळी ८.३० वाजता पोहोचलो. तेथे जावुन पाहिले असता पोलीसांनी सांगितल्याप्रमाणे गाडीची अवस्था झाली होती. आम्ही तेथुन गाडी घेवुन आलो. गाडीचे नुकसान झाले होते. पोलीसांनी तेथे तसा पंचनामा तयार केला. आता मला दाखवलेल्या पंचनाम्यावर माझी सही आहे तसेच पठाणचा अंगठा आहे. पठाण त्यावेळी तेथे हजर होता. सदर पंचनाम्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६३** देण्यात येत आहे.

०३. आता मला दाखवलेल्या निवेदनावर माझी व तळकरची सही व पठाणचा अंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६४** देण्यात येत आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकत नाही कारण १७ वर्षे झाली आहेत.

**सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.08.11 10:52:46 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)
दि. १०.०८.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.